CMYK

१५ वा सामना

Vs

कोलकाता नाईट रायडर्स वि.सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : ७.३० वा. स्थळ : कोलकाता

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ३८.०

किमान तपमान २५.६

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ३ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १८४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# बार्शीतील उदय लॉजमधील कुंटणखान्यात थरार

# पळापळ...आरडाओरड...फोनाफोनी...लपाछपी...धरपकडसुद्धा..!

✔ बार्शी-सोलापूर/प्रतिनिधी

**स्थळ - बार्शी शहरातील मध्यवर्ती पांडे चौकातील उदय लॉज हे ठिकाण... सायंकाळचे साडेसहा वाजलेले...लॉजमध्ये गिऱ्हाईकांची सुरु असलेली वर्दळ... आंबट शौकीन गिऱ्हाईकांच्या पसंतीला उतरण्यासाठी नट्टा-फट्टा करुन बसलेल्या वेश्या...मोबाईल पाहात खुर्चीवर रुबाबात बसलेला लॉजचा चालक...अशात एक गिऱ्हाईक लॉजमध्ये येतं... तिथं असलेल्या एका वेश्येला हाटकतं...दोघांमध्ये बोलणी होतात...'जे काही ठरायचं ते ठरतं' आपल्या पसंतीच्या महिलेस ते गिऱ्हाईक घेऊन प्रत्यक्ष रुममध्ये जातं... तोपर्यंत लॉजमधील कोणाला कसलाही संशय येत नाही... गिऱ्हाईक रुममध्ये जाताच बाहेर थांबलेल्या पोलिसांना कॉल येतो...स्क्रीनवर मॅनेज गिऱ्हाईकाचा इनकमिंग कॉल दिसताच पुढच्या काही क्षणात पोलिसांचा वेगाने लॉजमध्ये प्रवेश होतो...पुढे सुरु होते पळापळ...आरडाओरड ..अन् लपाछपी.... धरपकड... शहरात माजते एकच खळबळ...अन् संबंधितांची निघते पोलीस ठाण्यासह कोर्टात वरात ..!**




- ✔ बार्शीत उदय लॉजवर 'खाकी'वर्दीची अचानक धाड पडली सहा वेश्यांसह मालक, चालकाची पळता भुई थोडी झाली!
- ✔ शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी अनेक दिवसांपासून सुरु होता शरीर विक्रीचा राजरोसपणे धंदा
- ✔ महिलांच्या देहविक्रीचा कुंटणखाना चालवून मालक, चालक झाले गबरगंड

### काही ठळक नोंदी...

- लॉज चालक आणि मालक यास दोन दिवसांची पोलीस कोठडी
- संबंधित सहा महिलांना सुधारगृहात ठेवण्याचे बार्शी न्यायालयाचे आदेश
- उदय लॉजमधील कुंटणखाना उद्ध्वस्त केल्याचे सुज्ञ नागरिकांमधून समाधान
- कारवाईने बार्शीतील अन्य लॉज विश्वात मोठी खळबळ

प्रसिद्ध बाजार पेठ आणि मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेल्या तसेच प्रत्येक आघाड्यांवर सरशी राहणाऱ्या बार्शी शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या आणि नावारुपास आलेल्या उदय लॉजमध्ये पोलीस, देहविक्री करणाऱ्या महिला तसेच लॉज मालक आणि चालक यांच्यात बराच वेळ थरार झाला. या घटनेने येथील लॉज, हॉटेल विश्वात एकच खळबळ माजली.

येथील उदय लॉजमध्ये महिलांना ठेवून त्यांच्याकडून जबरदस्तीने देहव्रिकी करुन घेतली जात आहे. राजरोसपणे येथे हा बेकायदा धंदा चालविला जात आहे. मागील अनेक दिवसांपासून शहराच्या मध्यवर्ती भागात या लॉजमध्ये वेश्यांचा कुंटणखाना बिनदिक्कतपणे चालविला जात आहे. या संदर्भात सोलापूरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष विभागाला माहिती मिळाली होती. या माहितीच्या पार्श्वभूमीवर, प्रतिबंधक कारवाई म्हणून या विभागाने या लॉजवर धाड टाकून येथील कुंटणखाना उद्ध्वस्त केला.

या कारवाईदरम्यान देहविक्री करणाऱ्या सहा महिला आढळून आल्या. शिवाय कारवाईवेळी लॉज मालक आणि तसेच चालक यांनादेखील ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, सहा महिलांसह लॉजचा मालक आणि चालक या सर्व संबंधितांच्या विरुद्ध बार्शी शहर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम १४३(२), १४४(२), ३(५) गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास कक्षाचे पोलीस निरीक्षक रणजीत माने करत आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष सोलापूर शाखेच्या पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस फौजदार सविता कोकणे यांच्या पथकाने सायंकाळी साडेसहा वाजता बार्शी शहरातील मध्यवर्ती पांडे चौकात असलेल्या उदय लॉजवर मिळालेल्या माहितीनुसार अचानक धाड टाकली.

या धाडी दरम्यान या पथकाला बार्शी शहर तसेच लातूर, आळंदी, कारी, येथील सहा महिला सापडल्या. या महिलांकडून अनैतिक व्यापार करवून घेणाऱ्या लॉज मालक आनंद रमेश माने (वय ४२ रा. लोकमान्य मिल चाळ, बार्शी व चालक (सुनील ऊर्फ तात्या काशिनाथ माने (वय ६०, रा. लोकमान्य मिल चाळ नगर, बार्शी) या दोघांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईत पाचशे रुपये दराचे दोन चलनी नोटा, दोनशे रुपये दराचे दोन चलनी नोटा, असे एकूण चौदाशे रुपये व ॲपल कंपनीचा मोबाईल आदी साहित्य जप्त करण्यात आले.

### देहविक्रीसाठी बार्शीसह अन्य ठिकाणच्या महिला...

येथील उदय लॉजमध्ये प्रतिबंधक कारवाईवेळी पथकाच्या हाती सहा महिला लागल्या. या महिला बार्शी शहर तसेच लातूर, आळंदी, कारी येथील आहेत. या महिलांना येथे कायम ठेवून त्यांच्याकडून शरीर विक्रीचा धंदा करुन घेतला जात होता, अशी माहिती समोर आली आहे.




### 'उदय'वर कारवाई झाली अन्य लॉजचे काय?

महिला ठेवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करुन घेण्याच्या प्रकरणात बार्शी येथील केवळ उदय लॉजवर कारवाई करण्यात आली. मात्र या शहरातील अनेक लॉजमध्ये असेच तरुणाईला नासविण्याचे कुंटणखाने चालविले जात आहेत. तेसुद्धा उद्ध्वस्त करण्यात यावेत, त्यांच्यावरदेखील कारवाई करण्यात यावी, एकट्या उदय लॉजवरच कारवाई का? असा सवालदेखील उपस्थित केला जात आहे.

### अटक टाळण्यासाठी राजकीय वजनाचा वापर करण्याचा प्रयत्न

लॉजमध्ये महिलांना कायमचे ठेवून त्यांना देहविक्री करण्यास भाग पाडून त्यावर गुजराण करण्याच्या गुन्ह्यात अटक होत असल्याचे कळताच उदय लॉजचे मालक आनंद माने आणि चालक सुनील माने या दोघांनी बार्शीतील राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळींकडे वशिला लावून अटक टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला. पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी थेट कारवाई केली.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका २७ वर्षीय तरुणाने स्वतःच्या शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास दिंडूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे घडली. अंकित भीमाशंकर बळगाणुरे (वय २७ रा. दिंडुर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्याने स्वतःच्या शेतातील चिंचेच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले.

## दुचाकीस्वारांनी महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावले

### कुर्डुवाडीत पंधरा दिवसातील दुसरी घटना

✔ कुर्डुवाडी/प्रतिनिधी

बँकेतील कामकाज करून घरी निघालेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या गळ्यातील गंठण मोटरसायकल वरून आलेल्या अज्ञात दोन चोरट्यांनी हिसकावून घेऊन धूम ठोकली. ही घटना १ एप्रिल रोजी रात्री आठच्या सुमारास टेंभुर्णी रोड, आंतरभारती विद्यालय, कुर्डूवाडी येथे घडली.

बँकेचे कामकाज करून कुर्डूवाडी येथील आंतरभारती विद्यालयाच्या परिसरात राहणाऱ्या महिला कर्मचारी चालत निघाल्या होत्या. या दरम्यान मोटरसायकलवरून दोन चोरटे त्यांची वाट पाहत थांबले होते. महिला कर्मचारी रुबी हॉस्पिटलसमोर आल्या असता दोन अज्ञात चोरटे मोटरसायकलवर आलेले व त्यांनी



महिलेच्याा गळ्यात हात घालून ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसकावली. ते टेंभुर्णीच्या दिशेने वेगात निघून गेले.

दोन चोरट्याने तोंडाला मास्क घातला होता तर पाठीमागील बसलेल्या तरुण चोरट्याने रुमाल व टोपी घातलेली होती. या घटना वारंवार घडत असल्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**चोरट्यांचा एक प्रयत्न फसला**

परंडा रोड कुर्डूवाडी येथे या घटनेच्या अर्ध्या तासापूर्वी एका महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याचा प्रयत्न झाला होता. त्यानंतर आंतरभारती विद्यालय परिसरातील प्रकार घडला. चोरट्यांचा एक प्रयत्न फसला दुसरा प्रयत्नात त्यांनी गठण लंपास केले. त्यामुळे शहरातील मुख्य चौकामध्ये सीसीटीव्ही बसवण्याची मागणी महिलांमधून होत आहे.

## महिलेच्या चेहऱ्यावर फेकले ॲसिड

### संशयितास अटक

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील दक्षिण सदर बझार येथील बापूजी नगर येथे एका ३५ वर्षीय महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्याचा प्रकार घडल्याने परिसरात खळबळ म ाजली आहे. या ॲसिड हल्ल्यात संबंधित महिलेच्या चेहऱ्याला जखम झाली असून, तिची प्रकृती अत्यवस्थ आहे. तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. ही घटना मंगळवारी घडली.

या प्रकरणी रूपाली अभिजीत चंदनशिवे (वय-३५, रा. स्वार्टर हाऊस, जय भारत शाळेजवळ, बापूजी नगर, दक्षिण सदर बझार) यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून रवी ताकतोडे (वय-२०, रा.बापूजी नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी रूपाली चंदनशिवे व फिर्यादीचा मुलगा आणि लहान भाऊ विशाल हे घरी होते. यावेळी फिर्यादीच्या ओळखीचा मधु ताकतोडे यांचा मुलगा संशयित आरोपी रवी ताकतोडे हा घरी आला.फिर्यादीच्या आईला सून आली का असे का विचारले. याच रागातून थांब तुझ्या अंगावर आता ॲसिडच टाकतो असे म्हणून हातातील बाटलीमध्ये आणलेले ॲसिड फिर्यादीच्या तोंडावर मारले. यामुळे ती भाजून जखमी झाली. भाजल्याने संबंधित महिलेने आरडाओरडा केला. यावेळी परिसरातील नागरिक जमा झाले. भर वस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




पुर्वी या स्टाइलला नाकारलं होतं, आता त्याच्या मागे वेडे झालेत!

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 346-30-136 |
| संगम श्री नाईट | 270-93-148 |
| कल्याण | 880-66-367 |
| मुंबई | 128-16-240 |

### पालकमंत्री गोरे अन् माने यांच्यात आज भेटीचे आयोजन; स्नेहभोजनाला जाणार

# बाजार समितीची फुटणार कोंडी?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर बाजार समिती निवडणुकीची अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता येथून राजकिय घडमोडीला वेग येणार आहे. एकीकडे भाजपाने पॅनेल करण्याची तयारी सुरू केली आहे तर दुसरीकडे माजी आ. दिलीप माने यांनीही रणनीती आखण्यास सुरूवात केली आहे.

माने आणि भाजप नेते एकत्र आल्यास ही निवडणूक बिनविरोध होईल, असे बोलले जात आहे. मात्र यात नेमका पुढाकार कोण घ्यायाच असा प्रश्न असून पालकमंत्री जयकुमार गोरेच ही कोंडी फोडणार का याची उत्सुकता आहे. गुरूवारी ते दिलीप माने यांच्या निवास्थानी स्नेहभोजनाला जाणार आहेत. येथे मोठ्या घडमोडी घडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सोलापूर बाजार समिती ताब्यात घेण्याचे आदेश भाजपाच्या वरिष्ठांनी दिल्याने आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी तयारी सुरू केली आहे. सुरेश हसापुरे, बाळासाहेब शेळके, राजशेखर शिवदारे या मंडळींना एकत्र करण्याचे नियोजन त्यांच्याकडून सुरू असल्याचे समजते. आ. सुभाष देशमुख यांनी आपण भाजप म्हणूनच लढणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे तेही या गटात सामिल होणार हे निश्चित मानले जात आहे. दुसरीकडे भाजप विरोधात होण्याऱ्या आघाडीच्या विरोधात पॅनेल करण्याची तयारी माजी आ. दिलीप माने यांनी केली आहे. उत्तर आणि दक्षिणमधील बहुतांश सोसाट्यावर माने गटाचे वर्चस्व असल्याने त्यांचे पारडे या निवडणुकीत जड राहणार हे निश्चित. सध्या माने यांची भूमिका महायुतीला पोषक आहे. त्यामुळे माने आणि भाजपाचे आमदार एकत्र आले तर ही निवडणूक तडजोडी अंती बिनविरोध होऊ शकते, अशी चर्चा दोन्ही गटातून होत आहे. मात्र यासाठी पुढाकार कोण घेणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. दिलीप माने व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यात मार्केट कमिटीवर चर्चाच झालेली नाही. त्यामुळे चर्चेचे भिजत घोंगडे आहे. आता गुरूवारी पालकमंत्री जयकुमार गोरे दिलीप माने यांच्या निवासस्थानी जात आहेत. आता पालकमंत्रीच बाजार समितीची कोंडी फोडणार का याची उत्सुकता लागली आहे. गेल्या २० वर्षांपासून गोरे आणि माने यांचे ऋणानुबंध आहेत. या ऋणानुबंधातून युतीचे नवे अकूंर फुटणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.जुन्या मैत्रीतून ही भेट असली तरी तिथे मार्केट कमिटीची रणनीती ठरेल,असे सांगण्यात येते.



## पिंपरी येथे सशस्त्र दरोडा; महिलेचे दागिने लुटले

✔ **माळशिरस** : किचनच्या दरवाजाचे कुलूप तोडून दरोडेखोरांनी घरात प्रवेश करींत महिलेस मारहाण करून तिच्या अंगावरील दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ५ ८ हजारांचा ऐवज लुटून पोबारा केला. ही घटना मंगळवारी पहाटे एकच्या सुमारास पिंपरी (ता.माळशिरस) येथील करचेवाडीत घडली.

या संदर्भात मनीषा आप्पासाहेब करचे (रा. पिंपरी ता.माळशिरस) यांनी नातेपुते पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तिघा अनोळखी चोरट्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. मनिषा करचे या सोमवारी रात्री नेहमीप्रमाणे घराचा दरवाजा आतून बंद करून झोपल्या होत्या. मध्यरात्री एकच्या सुमारास दरोडेखोरांनी किचन रूमच्या दक्षिणेकडेल दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि मनीषा करचे यांना सतुरने जिवे ठार मारण्याची धमकी दिली. आणि आम्ही तुला काही करणार नाही. तु तुझ्या अंगावरील दागिने आणि पैसे काढून दे असे म्हणत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र,कानातील टाप्स आदी १६ ग्रॅम सोन्याचे तसेच पायातील चांदीची दागिने आणि १० हजार रुपये रोख काढून घेऊन पसार झाले. जाताना दरोडेखोरानी मनीषा यांच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला आणि पळून जाताना बाहेरील बाथरूम मध्ये टाकून दिला. पुढील तपास फौजदार दिघे करींत आहेत.

CMYK